# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## NANDED WAGHALA CITY MUNICIPAL COPRORATION, NANDED

Tender Notice सन २०२४-२५

Tender Notice No: - NWCMC/Health/E-TENDER/256 /२०२४ Dt.03/01 /२०२५

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे खालील दर्शविण्यात आलेल्या कामांकरिता अनुभवी उत्पादक/एजन्सी/कंत्राटदार यांचेकडून विहित नमुन्यात निविदा मागवित आहेत. सदर निविदा फक्त वेबसाईट https://mahatenders.gov.in वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वरील वेबसाईटवर नमुद असतील निविदा फक्त वेबसाईटवरुन ऑनलाईन खरेदी करता येतील व ऑनलाईनवरुनच भरता येतील. सर्व कंत्राटदाराना Digital Signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

ई-निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ. क. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे | 10.01.2025 | १५.०० |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे | 10.01.2025 | १५.०० |
| ३ | ई-निविदा भरणे | 10.01.2025 | १५.०० |
| ४ | ई-निविदा भरण्याचा अतिम दिनांक व वेळ | 21.01.2025 | १५.०० |
| ५ | ई-निविदा उघडणे | 22.01.2025 | १५.०० |

नांवाशमनपा अंतर्गत मोकळया जागेमध्ये विविध ठिकाणी पोर्टेबल कॅबिन तयार करुन बसविणेचे कामासाठीची अनामत रक्कम तसेच निविदेची किंमत खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | इसा-याची/ अनामत रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | नांवाशमनपा हद्दित राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग अंतर्गत विविध ठिकाणी पोर्टेबल कॅबिन (पोर्टा कॅबिन) बसविणे बाबत. | ५,२०,०००/- | २५,०००/- | ०३ महिने |

### अ) निविदा भरण्यासाठी लागणारी कागदपत्र (Technical Bid)

संकेत स्थळावर Upload करावयाचे कागदपत्र खालील प्रमाणे आहेत.

१) फर्म/संस्था नोंदणी प्रमाणपत्र
२) शॉप Act व उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र
३) निविदा शुल्क तसेच अनामत रक्कम ऑनलाईन भरणा केल्याची सत्यप्रत.
४) जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
५) पॅनकार्डची प्रत.
६) मागील तीन वर्षाचे (२०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४) आयकर भरणा केल्याचे विवरण पत्र.
७) मागील तीन वर्षाची आर्थिक उलाढाल बाबत सनदी लेखापाल (सी.ए.) यांचे प्रमाणपत्र. (प्रति वर्षाची आर्थिक उलाढाल ही किमान रु. २००.०० लक्ष किंमती एवढी असणे बधनकारक आहे.)
८) निविदेमध्ये दर्शविण्यात आलेल्या मुदतीत काम पुर्ण करण्याबाबतचे हमीपत्र.
९) निविदाधारक कोणत्याही शासकिय/निमशासकिय कार्यालयाच्या काळ्या यादीत नसल्याचे तसेच त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची फौजदारी/दंडात्मक कारवाई करण्यात आली नसल्याचे स्वंयघोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१०) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सीएटी-२०२२/प्र.क्र./इमा-२ दि.११.०५.२०२२ अन्वये ठेकेदाराने सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र ५००/- रुपयाच्या मुळ स्टॅम पेपरवर कामाचे नाव टाकुन जोडणे बंधनकारक आहे.

११) उत्पादक/एजन्सी/कंत्राटदार यांनी याप्रकारचे काम इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयात कलेले असणे अनिवार्य असुन त्याबाबतचे पुरावे सोबत जोडण्यात यावे.

१२) कागदपत्र छाननी अंती निविदाधारक यांनी उपरोक्त प्रमाणे कागदपत्रे सादर केल्याबाबतची तपासणी करून पात्र निविदा उघडण्यात येईल.

## ब) इतर नियम व अटी -

* उत्पादक/एजन्सी/कंत्राटदार यांनी ई-निविदा पोर्टलवर "बिडलॉक झाल्यानंतर निविदेबाबत" हार्डकॉपी १ प्रतीत दि 22/01/2025 रोजी दुपारी १५.०० पर्यंत वैद्यकिय आरोग्य अधिकारी कार्यालय, नांवाशमनपा, नांदेड यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे.

१) निविदा अनामत रक्कम/सुरक्षा रक्कमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही.

२) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यात कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

३) संबंधित उत्पादक/एजन्सी/कंत्राटदार यांनी कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून जागेचे काळजीपूर्वक निरिक्षण करून त्याप्रमाणे दर सर्व करासहित सादर करावेत.

४) लिफाफा क्र.०१ मध्ये तसेच निविदा मंजूरी नंतर व देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील. नांवाशमनपाचे कोणतही अधिकारी जबाबदार असणार नाहीत.

५) L-१ निविदा धारकाने कामाच्या किंमती नुसार ३.००% सुरक्षा अनामत रक्कम एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे डीडी/बँकर्स चेक/आरटीजीएस/एनईएफटी स्वरुपात भरणे आवश्यक आहे.

६) जागेची पाहणी केल्यानंतर साईट सर्व्हे रिपोर्ट आणि डिझाईन लेआऊट अहवाल वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणीत करुन निविदेसोबत जोडणे बंधंनकारक आहे.

७) जागेच्या उपलब्धेतनुसार पोर्टेबल कॅबिन एकुण उपलब्ध असलेली जागा साईट सर्व्हे रिपोर्ट आणि डिझाईन लेआऊटच्या आधिन राहुन करणे बंधनकारक असेल. पोर्टेबल कॅबिनची साईज जागेच्या साईट सर्व्हे रिपोर्ट आणि डिझाईन लेआऊटनुसार बदल करण्याचा अधिकार महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

८) संबंधीत कामासाठी ठेकेदार व कामगारांमध्ये काही तंटा, वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका कोणताही हस्तक्षेप करणार नाही. त्या सर्व कायदेशीर बाबींचा निपटारा करण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

९) ठेकेदार यांना उपलब्ध निधीप्रमाणे देयक अदा करण्यात येईल. देयकाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास ठेकेदार महानगरपालिकेस व्याजाची रक्कम मागणी करणार नाही.

१०) मंजूर निविदा धाराकांकडून नियमाप्रमाणे आयकर व अन्य कर तसेच सुरक्षा ठेव रक्कम देयकांमधून नियमानुसार कपात करण्यात येईल.

११) कंत्राटदारीचे काम करतांना कांही अपघात, मनुष्यहानी, वित्तीय हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदारावर राहील. महानगरपालिका यास जबाबदार राहणार नाही. कामगारांच्या सुरक्षिततेसाठीची जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्याच प्रमाणे काम करतेवेळी ठेकेदाराच्या कामगारांना अपंगत्व आले, अपघात, इजा झाली अथवा मरण पावले तर त्याच्या नुकसान भरपाईची जबाबदारी संबधीत कंत्राटदार यांची राहील.

१२) मोकळ्या जागेत पोर्टेबल कॅबिन तयार करण्यासाठी जागेची संख्या कमी/अधिक करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१३) अकार्यक्षमतेमुळे करार मोडला किंवा ठेकेदाराने मध्येच काम थांबविले तर सुरक्षा रक्कम महानगरपालिकेव्दारा जप्त केली जाईल.

१४) कंत्राटदाराने उपकंत्राटदार ठेवू नये तथापि असे निदर्शनास आल्यास देण्यात आलेला ठेका त्याक्षणीच कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. अशा परिस्थितीत कंत्राटदाराचे प्रलंबीत देयक व सुरक्षा अनामत रक्कम कोणतेही कारण न देता जप्त करण्यात येईल.

१५) निविदेतील तक्रारीसंबंधीत आक्षेप असल्यास रु. ५०,०००/- अक्षरी रक्कम पंन्नास हजार रुपये फक्त धनाकर्ष एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, नांवाशमनपा नांदेड या नावे जमा करण्यात यावे. तक्रारीमध्ये चौकक्षीअंती काही तथ्य नसल्यास सदर रक्कम जप्त करण्यात येईल.

१६) कोणत्याही अटीच्या अर्थात किंवा इतर कोणत्याही बाबतीत वाद उदभवल्यास मा. आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांचा निर्णय अंतिम निविदाधारकास बंधनकारक राहील तसेच कोणत्याही कारणाशिवाय एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

१७) निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने मा.आयुक्त, मनपा यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात १०००/- रुपयेच्या (अक्षरी रक्कम एक हजार रुपये फक्त) स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे आवश्यक आहे.

१८) L-१ निविदा धारकाने कामाच्या ठिकाणी १० पेक्षा अधिक कामगारांचा समावेश असेल तर त्याचा नियमानुसार EPF व ESI चा भरणा करणे अनिवार्य राहिल. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी L-१ निविदा धारकाची राहील.

१९) सदर कामासाठी थर्डपार्टी म्हणून शासकीय तंत्रनिकेतन/शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचा अहवाल घेणे बंधनकारक असेल त्यासाठी लागणारे शुल्क एजन्सीने भरणा करणे बंधनकारक राहिल.

२०) सदर कामासाठी एक वर्षाची हमी (Guarantee) कालावधी असेल.

२१) निविदेतील मंजुर करण्यात आलेले दर एक वर्षाकरीता वैद्य राहतील.

२२) सदर कामासाठी वाहतूक खर्च/लोडींग-अनलोडींग तसेच कॅबिन बसविणेसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ ईत्यादीचा खर्च एजन्सीकडे असेल. सदर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्तीमध्ये कोणतीही पूर्व सुचना न देता रद्द करणेचा/राखून ठेवण्याचा तसेच सुधारणा करण्याचा हक्क मा.आयुक्त, नांवाशमनपा, नांदेड यांनी राखून ठेवला आहे.

२३) सदर काम वेळेत पूर्ण न केल्यास कामांच्या किमतीच्या ०.५०% प्रति आठवडा कमाल ५.००% याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

२४) निविदा धारकाने सादर करावयाचे दर सर्व करासहीत सादर करणे बंधनकारक राहील.

२५) दर निश्चित करताना आवश्यकते प्रमाणे अनुभव असलेल्या निविदा धारकाशी वाटाघाटी करुन दर व निविदा धारक निश्चित करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

२६) पोर्टेबल कॅबिन तयार करुन बसविण्याकरीता जागेचे सर्व प्रकारचे काम कंत्राटदारास करावे लागेल. त्याकरीताचे अतिरिक्त देयक अदा केले जाणार नाही किंवा अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

२७) वरील अटी व शर्तीचा भंग केल्याचा अथवा महानगरपालिका हितास बाधक ठरत असल्यास पुर्व सुचना देवून महानगरपालिका निविदा नामंजूर करुन पत्रक (ठेका) रद्द करण्यात येईल.

२८) निविदे संदर्भात कोणताही दावा, वाद व मतभेद उदभवल्या कारवाईचे कारण नांदेड येथे उदभवले असे मानले जाईल व अशा कोणत्याही दावा, वाद किंवा मतभेद संदर्भात सर्व कायदेशीर कारवाई नांदेड शहरातील सक्षम न्यायालयात सुरु केली जाईल.

-स्वा-
**आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

प्रतिलिपी:-

१) नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२) ई-टेंडरींग विभाग/संगणक विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**NANDED WAGHALA CITY MUNICIPAL COPRORATION, NANDED**

Tender Notice सन २०२४-२५

Tender Notice No: - NWCMC/Health/E-TENDER/ 262 /२०२५ Dt.08 /01 /२०२५

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थाळावर http://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा अटी/शर्ती संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.

- स्वा -

अतिरिक्त आयुक्त

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति :

मा.संपादक, दै. लोकमत / दै. पुण्यनगरी (विभागीय) यांना

देऊन विनंती करण्यात येते की, सदरील निविदा सूचना आपल्या अंकात **दिनांक:-**10/01/२०२५ च्या दैनिकात कमीत कमी 8X12 **चौ.से.मी.** मध्ये शासकीय दराप्रमाणे प्रसिध्द करुन अंकाचे तीन प्रति व बिलाच्या दोन प्रतिसह कार्यालयात शासनमान्य दराची प्रति जोडून सादर करावे.

अतिरिक्त आयुक्त

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

# Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded

**Name of Work : Providing, Fixing and Installation of G.I. Fabricated Portable Cabin at Various Places in Nanded City, NWCMC, Nanded**

## ``Rate Quoted`` (As per Plan Enclosed)

| Sr. No. | Product Description | Size | Quantity (Nos.) | Price per number Including GST and all taxes (Rs.) | Total Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Portable Cabin (as per technical specification mentioned in Tender Document) | Minimum Area 500 Sq ft | 12 | | |

**Signature of Agency/Company/Contractor**

**With Seal**

## Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded

**Name of Work : Providing, Fixing and Installation of G.I. Fabricated Portable Cabin at Various Places in Nanded City, NWCMC, Nanded**

### New Fabricated Portable Cabin (Size Min. 500 Sq.Ft) Specification

| Sr. No. | COMPONENTS | DESCRIPTION |
|---|---|---|
| 1 | Bottom Frame | 100mm X 50mm I BEAM<br>(ISMB/ISMC Structure) |
| 2 | Top Frame | 50mm x 50mm MS Sq. Pipe<br>(ISMB/ISMC Structure) |
| 3 | Stiffener Bottom | 100mm x 50mm 1 BEAM<br>(Mild steel structure with rust proof coating) |
| 4 | Stiffener Top | 40mm x 20mm MS Sq. Pipe<br>(Mild steel structure with rust proof coating) |
| 5 | Side Post | 65mm x 65mm MS Sq. Pipe<br>(Mild steel structure with rust proof coating) |
| 6 | Panelling Outside | Corrugated GI Sheet I mm |
| 7 | Internal Wall Panelling | 8mm MDF Sheet<br>(Smooth finish with washable walls) |
| 8 | Roof Outside | GI Sheet-thick Properly Sloped and water tight. |

| Sr. No. | COMPONENTS | DESCRIPTION |
|---|---|---|
| 9 | False Ceiling | MDF Board-Plane White/gypsum boards |
| 10 | Bottom Flooring | Cement Fibre board with Vinyl Carpet over it/metal painted plates |
| 11 | Aluminium Windows (3x3) | 2 Track Sliding Windows Aluminium Powder Coated with Safety Grills |
| 12 | Door 3'x6.''6'' | Insulated with for locking agreement, Hold draft & Handles |
| 13 | Door for cabins | Swing door/sliding door |
| 14 | Toilet | Toilet: With W/C with flush tank, Towel Ring, Soap Dish, Exhaust fan, Wash Basin, Mirror, Jet Spray etc |
| 15 | Wiring | All wiring shall be concealed type & shall be of PVC insulated copper wire (Polycab). |
| 16 | Electrical Fittings | All electrical finings in the Portable Cabin shall be with capacity of 220-240 V, AC 50Hz. Led Panel Light, Door Light, Fan, Switches, Sockets, Air Conditioners Point (MCB), Electrical fittings brands are as of standard with defined product warranty. |
| 17 | Earthing | Earthling Point shall be provided for SAFETY |
| 18 | Outside Painting | One coat of Epoxy primer with 2 Coat of Epoxy Paint. |
| 19 | Legs | 6-inch height, 8 legs at all four corners |
| 20 | Hooks | Specially formed Hooks for Easy lifting and shifting |
| 21 | Insulation | Glass wool |
| 22 | Mounting Base | Should be properly installed/built on floor space provided on site |

**Additional Commissioner**
**Nanded Waghala City Municipal Corporation, Nanded**

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान १५ वा वित्त आयोग

आयुष्मान आरोग्य मंदिर  पोर्टा कॅबिन बसविण्याकरीता मनपाच्या मोकळया जागेची

तात्पुरती यादी

१) आंबानगर
२) बालाजी नगर- सखुजी नगर
३) गोकुळ नगर
४) शांती नगर
५) मिल्लत नगर
६) असर्जन
७) गंगाचाळ/पक्कीचाळ
८) अबचल नगर
९) हाडको
१०) गजानन मंदिर
११) विष्णुनगर
१२) नवाघाट